# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,

कृषि नगर वसमत रोड,परभणी-४३१ ४०२ (महाराष्ट्र)


वाचा : १. सामान्य प्रशासन विभाग,महाराष्ट्र शासन, यांचे परिपत्रक क्रमाक: सीडीआर-१०९५/१०७/प्र.७/९५/ अकरा, दि.०६ मे १९९५

२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९

विद्यापीठ अधिकारी /कर्मचारी यांचेकडून सेवाविषयक/ वैयक्तिक कामाबाबत शासनास तसेच मा.मंत्री महोदय यांना थेट पत्रव्यवहार न करण्याबाबत.

## परिपत्रक

क्रमाक:२०२३/प्र.क्र.६/परिपत्रक /आस्था-८

दिनांक : २६ /०९/२०२३ | ४२९५

प्रकरणी विद्यापीठातील अधिकारी /कर्मचारी यांनी त्यांच्या सेवाविषयक व अन्य तक्रारी संबंधीत गाऱ्हाणी त्यांच्या वरिष्ठामार्फत विद्यापीठ प्रशासनाकडे योग्य माध्यमाव्दारे सादर करणे अपेक्षित असून हिच पध्दत नियमाधिष्ठीत आहे, परंतु विद्यापीठ प्रशासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, विद्यापीठातील अधिकारी / कर्मचारी हे शासनाकडे तसेच मा.मंत्री महोदय यांचेकडे थेट लेखी तसेच प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरित्या संपर्क करून कर्मचारी हे स्वताच्या गरजेनुसार सेवाविषयक तसेच वैयक्तीक कामे होण्यासाठी शिफारशी प्राप्त करून घेतात किंवा याकरीता विद्यापीठ प्रशासनावर दबाव आणून कामे करून घेण्याचा अवलंब करतात, त्यामुळे कर्मचारी / अधिकारी यांच्या अशाप्रवृत्तीमूळे विद्यापीठातील संशोधन, विस्तार, शिक्षण या विभागाच्या विकास धोरणावर अडसर निर्माण होत असून याचा दूरगामी परिणाम प्रत्यक्ष विद्यापीठावर पडत आहे.

सबब, याव्दारे सर्व विद्यापीठांतर्गत अधिकारी /कर्मचारी यांना सक्तपणे सूचित करण्यात येते की, यापुढे सेवाविषयक/ वैयक्तीक तसेच अन्य प्रकरणी तक्रारी संबंधीत गाऱ्हाणी संबंधात विद्यापीठाचा संबंध आहे, त्यासंबधात योग्य माध्यमाव्दारे विद्यापीठ प्रशासनाकडे सादर करणे अपेक्षित आहे, याउपरही जर विद्यापीठ प्रशासनाला डावलून शासनास किंवा मा.मंत्री महोदय यांचेकडे थेट लेखी, प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष तक्रारी/गाऱ्हाणी इत्यादी बाबत शिफारशी प्राप्त झाल्याचे निदर्शनास आल्यास सदरची कृत्ती गैरवर्तन समजले जावून संबधीता विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम १९७९ नुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

मा.कुलगुरु महोदय यांचे मान्यतेने,

(पु कों काळे)
कुलसचिव

प्रतिलीपी :

१.संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि) /संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि,परभणी

२. नियंत्रक/विद्यापीठ अभियंता,वनामकृवि,परभणी

३. उप कुलसचिव (आस्था / साप्रवी /विद्या ) कुलसचिव कार्यालय, वनामकृवि,परभणी

यांना देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक हे आपल्या अधिनिस्त असलेल्या कार्यालय प्रमुख / विभाग प्रमुख यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

प्रत:-

१. प्रभारी अधिकारी,मध्यवर्ती संगणक केंद्र,वनामकृवि,परभणी यांना माहितीस्तव देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसारीत करावे.

२. मा.कुलगुरुं महोदय, यांचे खाजगी सचिव,वनामकृवि,परभणी.